सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
गृहविभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्र. ०२२– २४१२३१११

ई–मेल – mumbaipolice.desk9@gmail .com

कक्ष–९ (कनिष्ठ आस्थापना/भरती कामकाज),
मध्यवर्ती पोलीस भरती कक्ष, न्यु. बी.डी.डी.चाळ क्र.६,
नायगांव, दादर (पूर्व), मुंबई–४०० ०१४

---

जा.क्र. पोआ/कक्ष–९/(१)/1086 /२०२१

दिनांक –16 /12/२०२१

प्रति,

**मा. पोलीस आयुक्त,**
(वेब डेव्हलपमेन्ट सेंटर)
बृहन्मुंबई.

विषय:- मुंबई पोलीस शिपाई भरती २०१९ ''अनाथ समांतर आरक्षण निकालाबाबचे शुध्दीपत्रक'' प्रसिध्द करणेबाबत....

मुंबई पोलीस शिपाई भरती २०१९ ''अनाथ समांतर आरक्षण निकालाबाबचे शुध्दीपत्रक'' प्रसिध्द करणेबाबत सूचना मुंबई पोलीस दलाच्या www.mumbaipolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती आहे.

( योगेश कुमार )
पोलीस उप-आयुक्त,(मुख्यालय -२)
पोलीस आयुक्त कार्यालय बृहन्मुंबई

Scanned with CamScanner

# मुंबई पोलीस शिपाई भरती - २०१९

## ''अनाथ समांतर आरक्षण निकालाबाबत शुध्दीपत्रक''

मुंबई पोलीस शिपाई भरती - २०१९ मध्ये ''अनाथ'' (Orphan) या समांतर आरक्षण वर्गाकरिता खुल्या प्रवर्गात ५ जागा उपलब्ध आहेत. दिनांक १४/११/२०२१ रोजी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांमधून १:१० या प्रमाणात अनाथ प्रवर्गासाठी एकुण ५५ उमेदवारांची यादी जाहीर करून त्यांना दिनांक ०६/१२/२०२१ रोजी कागदपत्र तपासणीकरिता नायगांव पोलीस मुख्यालय मुंबई येथे बोलविण्यात आले होते. नमूद दिवशी एकुण ५५ उमेदवारांपैकी फक्त ९ उमेदवार हजर राहिले व त्यापैकी प्रत्यक्ष ''अनाथ'' या प्रवर्गाचे प्रमाणपत्र असलेले खरेखुरे अनाथ उमेदवार फक्त ५ असल्याचे निर्दशनास आले. याबाबत एका अपात्र अनाथ उमेदवाराने असा लेखी आक्षेप घेतला आहे की, अनाथ प्रवर्ग दर्शविलेले बहुसंख्य पात्र उमेदवारांनी फॉर्म भरताना चुकीने अनाथ प्रवर्ग दर्शविला आहे व त्या नजरचुकीने अनाथ प्रवर्ग भरलेला उमेदवारांना पात्र ठरविले आहे. त्यामुळे खरेखुरे अनाथ उमेदवारांवर अन्याय झाला आहे.

सदरच्या आक्षेपमध्ये काही अंशी तथ्य असल्याचे प्रथमदर्शी निदर्शनास आल्याने निवड समितीने असा निर्णय घेतला आहे की, अनाथ प्रवर्ग दर्शविलेल्या सर्व उमेदवारांची कागदपत्रांची प्रथम पडताळणी करून त्या प्रवर्गाचे प्रमाणपत्र असलेल्या खऱ्याखुऱ्या अनाथ उमेदवारांची यादी नव्याने जाहिर करून त्यामधील १:१० या प्रमाणात गुणवत्तेनुसार प्रथम ५० उमेदवारांना मैदानी चाचणी करिता पात्र करण्यात येईल व या पात्र उमेदवारांमधून अंतिम निवड केली जाईल. त्या अनुषंगाने दिनांक १३ ते १७ डिसेंबर २०२१ या दिवशी सर्व अनाथ प्रवर्ग दर्शविलेले उमेदवारांची कागदपत्र पडताळणी करून पुढील कारवाई करण्यात येणार आहे व दिनांक १७/१२/२०२१ रोजी अनाथ प्रवर्ग मधून पहिले ५० उमेदवार मैदानी चाचणी करिता पात्र ठरलेबाबतची यादी जाहिर करण्यात येणार आहे व त्याप्रमाणे दिनांक २६/११/२०२१ रोजी जाहिर केलेली यादी सुधारण्यात येणार आहे. सर्व अनाथ प्रवर्गातील उमेदवारांनी या बदलाची नोंद घ्यावी.

(योगेश कुमार)

सदस्य, मुंबई पोलीस शिपाई भरती २०१९

तथा पोलीस उप आयुक्त, (मुख्या-२)

पोलीस आयुक्त कार्यालय बृहन्मुंबई.

Scanned with CamScanner